ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 5...
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख ७ मे, १९५२ | अंक १९

## विविध माहिती

**भारतासाठी नवी बोट**— मुंबईच्या मलबार स्टीमशिप कंपनीनें एक ऑस्ट्रेलिअन माल वहातुकीची बोट नुकतीच विकत घेतली आहे. ह्या बोटीचें नांव 'जयशूर' असें ठेवण्यांत आलें आहे. बोटीनें आपल्या पहिल्याच प्रवासांत ९,००० टन ऑस्ट्रेलिअन गहू आणला. वरील कंपनीच्या मालकीच्या आतां ६ बोटी झाल्या आहेत.

**फक्त एका दशांशाची चूक**—डेन्मार्कच्या आगामी अंदाजपत्रकांत वास्तविक १५,००,०००, क्रोनरची तूट असावयास पाहिजे. परंतु त्याऐवजीं ७०,००,००० क्रोनरची शिल्लक दाखविण्यांत आली. चौकशी करतां असें समजलें कीं दशांश अपूर्णांकाचें चिन्ह भलत्याच जागीं दिलें गेल्यामुळें हा चमत्कार घडून आला होता.

**रशिआचें तेलाचें उत्पादन**—१९५० सालांत सो. रशिआंतील तेलाचें उत्पादन युद्धपूर्व-कालाशीं तुलना करतां २२ टक्क्यांनीं वाढलें असल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे. गेल्या महायुद्धांत प. रशिआंतील तेलाचीं केंद्रें उध्वस्त झालीं होतीं. तीं आतां पुन्हा चालू करण्यांत आलीं असून तेल उपसण्याची नवी पद्धतही अंमलांत आणण्यांत आली आहे.

**भाताच्या उत्पादनाचे प्रयत्न**—हैद्राबाद सरकारनें येत्या पांच वर्षांत राज्यांतील भाताचें उत्पादन १,८०,००० टनांनीं वाढविण्याचें ठरविलें आहे. त्यासाठीं सुधारलेलें बियाणें आणि खतें ह्यांचा उपयोग करण्यांत येणार आहे. हैद्राबाद राज्याला दरवर्षीं सुमारें ७०,००० टन तांदुळाची तूट पडते.

**नवीन भांडवलाची उभारणी**—१९५१ च्या पहिल्या सहा महिन्यांत १८० कंपन्यांना मिळून ३०.६३ कोटी रुपये भांडवल उभारण्याची परवानगी भारतीय सरकारनें दिली. ६.४९ कोटी रुपये भांडवलाचे ३७ अर्ज नाकारण्यांत आले. परवानगी मिळालेल्या कंपन्यांपैकीं ९३ कंपन्या औद्योगिक होत्या.

**राजस्थानांत ताडगूळ**—राजस्थान सरकारनें आपल्या राज्यांत ताडगूळ तयार करण्याची एक पंचवार्षिक योजना आखली आहे. योजनेप्रमाणें १९५६ सालापर्यंत राज्यांत दरवर्षी २१,६०० मण ताडगूळ निर्माण होऊं लागेल.

**फुकट प्रवास करणारे**—फेब्रुआरी १९५२ मध्यें सेंट्रल रेल्वेवर फुकट प्रवास केल्याबद्दल ६७,७८६ लोकांना अटक करण्यांत आली. त्यांत भिकाऱ्यांचा समावेश नाहीं. ह्या प्रवाशांकडून रेल्वेनें १,९९,८०८ रुपये दंड म्हणून वसूल केले.


# रक्कम गुंतविणारास संधि

कारखान्याच्या वाढीकरितां तसेंच कामगार-वसाहतीकरितां आम्हीं आणखी रु. दीड लाखापर्यंत एक ते पांच वर्षें मुदतीच्या ठेवी स्वीकारण्याचें ठरविलें आहे. सध्याच्या ठेवीदारांस व भागधारकांस प्राधान्य देण्यांत येईल. कंपनीचे ताळेबंद ठेवीदारांस पाठविण्यांत येतात.

—: अधिक माहितीकरितां लिहा :—

## साठे बिस्किट व चॉकोलेट कंपनी लि., पुणें २.

### काश्मीरचें औद्योगिक धोरण

जम्मू चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष श्री. गिरधरलाल आनंद यांनी पत्रकारांसमोर काश्मीरची औद्योगिक परिस्थिति सुधारण्याबद्दल पुढील विचार व्यक्त केले:—काश्मीरचें हिंदशीं आर्थिक दृष्ट्या एकीकरण झालें पाहिजे. काश्मीरमध्यें हिंदमधून येणाऱ्या मालावर कांहीं ठिकाणीं मालाच्या किंमतीच्या २०० टक्के जकात असते जकातीचा दर जास्त असल्यामुळें काश्मीरमधील राहणीचा खर्च हिंदपेक्षां ५० टक्यांनीं, तेवढ्याच दर्जाच्या राहणीला, महाग बनला आहे. या जकाती रद्द केल्यानें काश्मीरची अंतर्गत परिस्थिति सुधारण्यास मदत होईल 'काश्मीर स्वयंपूर्ण लोकराज्य राहील' या घटना परिषदेंतील विधानानें व्यापारी वर्गामध्यें चिंता निर्माण झाली आहे, ही गोष्ट इष्ट नाहीं. कारण, स्वयंपूर्ण लोकराज्य रहावयाचें तर कस्टम्सच्या जकाती चालू रहाणारच. राष्ट्रीयीकरण किंवा जमिनींची नुकसानभरपाई न देतां त्या सरकारजमा करणें, घरेंहि नुकसानभरपाईशिवाय सरकारजमा करणें, अशी भाषा कांहींकडून बोलली जाते. या बाबतींत जास्त काळजीपूर्वक विचार झाला पाहिजे. कारण, लोकांमध्यें विश्वास निर्माण होण्यासाठीं सरकारनें आपलें धोरण स्पष्ट करावें. दोन वर्षांपूर्वीं लादलेला पुरांवड्याचा कर रद्द करावा. काश्मीरमधील अंतर्गत व्यापार वाढविण्यासाठीं तेथील सरकारनें कांहींच प्रयत्न केलेले नाहींत; तर उलट सरकारी धोरण नकारात्मक दिसतें व स्पष्ट विधायक कार्यक्रमाचा अभाव दिसतो. एकंदरींत, काश्मीरनें हिंदशीं आर्थिक दृष्ट्या विलीन होणें औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीनें फायदेशीर ठरेल.

### शिराळा येथील सहकारी शिक्षणवर्ग

द. सातारा जि. को. बोर्डाचे विद्यमानें शिराळा येथें श्री. एन्. आर. देसाई, एम. ए., एलएल. बी, महालकरीसाहेब यांचे अध्यक्षतेखालीं सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्गाचा उद्घाटन समारंभ साजरा झाला.

सदर समारंभाचे प्रसंगीं श्री. व्ही. के. हसबनीस संचालक सर्वोदय शिराळा केन्द्र, एल्. के. हसबनीस वकील, श्री. जी. बी. पाटील बँक इन्स्पेक्टर, श्री. भाऊसाहेब बाळासाहेब पाटील, श्री. डी. बी. निकम बोर्डाचे चेअरमन व सेक्रेटरी यांचीं प्रसंगोचित भाषणें झालीं. समारंभास शिराळा येथील प्रतिष्ठित सन्माननीय नागरिक व विद्यार्थी मिळून अदमासें १००–१२५ समुदाय हजर होता. वर्गाचे चालक श्री डी. बी. निकम हे आहेत. सदर वर्गामध्यें ३०–४० विद्यार्थ्यांना प्रवेश देणेंत आला आहे.

### हैद्राबादेंत लँड मॉर्गेज बँका

हैद्राबाद येथें १० लक्ष रुपये भांडवलाची एक सेंट्रल को. लँड मॉर्गेज बँक स्थापन करण्यांत येत आहे. तिचेबरोबर प्राथमिक लँड मॉर्गेज बँकाहि काढण्यांत येतील. तूर्त अशा आठ बँकांस मंजुरी देण्यांत आली आहे. सेंट्रल बँकेचें १ लक्ष रुपयांचे भाग सरकार घेणार आहे. प्रत्येक प्राथमिक लँड मॉर्गेज बँकेस कमाल ५०,००० रु. कर्जाऊ देण्यासाठीं सेंट्रल बँकेस सरकार ४ लक्ष रु. कर्ज देणार आहे. अर्थमंत्री हे सेंट्रल बँकेचे चेअरमन रहातील.

### कर्जांत वाढ, ठेवींत घट

१९५१ सालीं सर्व हिंदी बँकांनीं मिळून दिलेल्या कर्जांत १९५० चे मानानें १०३ कोटी रुपयांची वाढ झाली. त्यांच्या ठेवींत मात्र ३१ कोटी रुपयांची घट झाली.


## "The Shembekar Technical and Technological Foreign Scholarship Fund."

Raobahadur G. G. Shembekar, the renowned Agricultural Expert of Baramati, has created a Trust with a view to encourage the study of Technical and Technological Education. The amount of Trust is Rs. One Lac and from the interest earned on this amount, pecuniary aid in the form of Scholarship will be advanced to deserving students in India (Residents in Maharashtra preferred) who intend to proceed to foreign countries for higher education in the line. Every year about Rs. 4,000/- will be granted as Scholarships and the amount so advanced for the Scholarship is to be returned in instalments.

In addition to this amount of Rs. 4,000/- the Trust also provides for a Scholarship of Rs. 2,000/- per year to be given to Employees (or their dependents) of M/S. Kirloskar Brothers Ltd., Kirloskarvadi.

The present Trustees of this Trust are :—

(1) Shri Ganesh Gopal Shembekar.
(2) Shri Baburao Ganpatrao Jagtap.
(3) Shri Shantanu Laxman Kirloskar.

For further details and the application form, please write to "The Shembekar Technical and Technological Foreign Scholarship Fund" C/o Shri Shantanu Laxman Kirloskar, 13, Elphinstone Road, Kirkee—Poona 3.



## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवीवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वीं आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay



## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

## मुंबई राज्यांतील इंडस्ट्रिअल को. सोसायट्या आणि खेडेगांवी धंदे

### १९४९–५० चा सरकारी अहवाल

मुंबई राज्यांतील इंडस्ट्रिअल को. सोसायट्या व व्हिलेज इंडस्ट्रीज ह्यासंबंधीं ३० जून, १९५० अखेर संपलेल्या वर्षाचा अहवाल सहकारी खात्याकडून आमचेकडे नुकताच आला आहे, त्यावरून खेडेगांवी उद्योगांबाबत सरकारनें पुरस्कारलेल्या योजनांच्या प्रगतीची व परिस्थितीची कल्पना येते व तपशीलवार माहिती मिळते. रजिस्ट्रारनीं आपल्या प्रास्ताविक पत्रांत म्हटल्याप्रमाणें, औद्योगिक सहकारी सोसायट्यांच्या संख्येंत व त्यांच्या सभासदांत वाढ झाली आहे, पण त्यांचे व्यवहार आणि त्यांचें खेळतें भांडवल ह्यांत मात्र घट दिसून येते. ह्याचें मुख्य कारण म्हणजे विणकरांच्या व इतर सोसायट्यांतील सूतवांटपाचें काम बरेंच कमी झालें, हें होय. खालील तक्ता हें स्पष्ट करीत आहे:—

**औद्योगिक सोसायट्यांसंबंधीं तुलनात्मक आकडे**

| संस्था | वर्ष | सोसायट्यांची संख्या | सभासद संख्या | एकूण खरेदी व विक्री | खेळतें भांडवल | नफा | तोटा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रु. | रु. | रु. | रु. |
| औद्योगिक सोसायट्या (विणकर सोसायट्या वगळून) | १९४७–४८ | २२७ | १६,२०७ | ४७,७४,३२४ | १९,७१,१४२ | १,५९,८५१ | ... |
| | १९४८–४९ | ३७५ | २८,४२५ | १,१५,६२,६८२ | ४८,८२,२६५ | २,६२,८७९ | ... |
| | १९४९–५० | ५२९ | ३०,५२८ | ९८,२९,१०७ | ६५,०४,८७५ | ५,३२,२७९ | ४,३३,४०१ |
| विणकरांच्या सोसायट्या | १९४७–४८ | २११ | २७,६२८ | २,६३,५३,०८८ | ३२,५९,५६० | ४,३२,६२३ | ... |
| | १९४८–४९ | २६८ | ४२,६९१ | ४,१०,९३,७५६ | ८२,५४,१३३ | ४,१२,७५४ | ... |
| | १९४९–५० | ३५४ | ४७,७९४ | १,८१,६८,०१८ | ६१,६४,८२३ | २,४२ ४११ | १,७९,३५७ |
| जिल्हा औद्योगिक असोसिएशन्स | १९४७–४८ | १५ | १५,१८९ | १,१४,०१,१६० | २६,०१,६३२ | २,२३,३९७ | ... |
| | १९४८–४९ | १४ | १०,२३२ | २,६२,२८,५४६ | ९९,६९,९३७ | ... | २४,९४१ |
| | १९४९–५० | १५ | ९,८९९ | १,४७,७०,६५३ | २८,११,२८५ | १८५,४०१ | १,१६,४८९ |
| प्रॉ. इं. को. असोसिएशन | १९४७–४८ | १ | २०९ | ४३,३१,२९७ | ४,४१,४१४ | १५,०१३ | ... |
| | १८४८–४९ | १ | २०६ | ३,४५,१७,४०९ | ९८,०६,५४१ | १,९७,१९१ | ... |
| | १९४९–५० | १ | ४४० | १,७७,८७,७३३ | १५,३७,४०९ | १,५०,३९० | ... |
| प्रादेशिक जिल्हा औद्योगिक सहकारी बँका | १९४७–४८ | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | १९४८–४९ | ३ | १९१ | ... | १,३४,००० | ... | ... |
| | १९४९–५० | ४ | ७०८ | ... | २,६४,५४३ | ... | ९,९८४ |
| एकूण... | १९४७–४८ | ४५४ | ५९,२३३ | ४,६८,५९,८६९ | ८२,७३,७४८ | ८,००,८५८ | ... |
| | १९४८–४९ | ६६१ | ८१,८६५ | ११,३४,०२,३९३ | ३,३०,२६,८७६ | ८,४७,८२३ | ... |
| | १९४९–५० | ९०३ | ८९,३६९ | ६,०५,५५,५११ | १,७२,८२,९३५ | ११,१०,४८१ | ७,३९,२३१ |

**गुजराथसाठी पंपांची मदत**—गुजराथ दुष्काळनिवारक कमिटीला मुंबई सरकारनें १०० ऑइल इंजिनें पंपासकट वापरण्यासाठी दिलीं होतीं. ह्या एंजिनांचा व पंपांचा उपयोग गुजराथमधील १० जिल्ह्यांतून करण्यांत येत आहे. अन्नधान्य आणि चारावैरण ह्यांचें उत्पादन करण्यांत येत आहे.

**मोत्यांसाठी शोध**—मोती सांपडणारे समुद्राचे तळ शोधून काढण्यासाठी सीलोनच्या सरकारनें ७०० चौरस मैल समुद्राचें संशोधन करण्याचें ठरविलें आहे. ह्यापूर्वी ज्या ९ ठिकाणीं मोत्यांचे शिंपले सापडत असत तेथें आतां लव्हाळ्यांचें रान माजल्याचें आढळून आलें आहे.

**गुन्हेगारांचे चित्रपट बंद करा**—पॅरिसमध्यें सध्यां गुन्हेगारांचें प्रमाण वाढलें असून टॅक्सीवाल्यांना त्याची विशेष झळ लागली आहे. त्यांच्यापैकीं एकाचा खुन झाल्यामुळें टॅक्सी चालविणारांच्या युनिअननें एक ठराव करून गुन्हेगारांच्या जीवनावरील बोलपट दाखविण्यांत येऊं नयेत अशी मागणी सरकारकडे केली आहे.

**ॲबिसिनिआच्या राजाची प्रवासी गाडी**—ॲबिसिनिआचा बादशहा हेल सलासी ह्यानें प्रवास करण्यासाठी एक खास गाडी अमेरिकेहून मागविली आहे. गाडींत ४ माणसांना रहाण्याची व झोपण्याची व्यवस्था करण्यांत येईल. पंक्चर न होणारी सहा चाकें बसविण्यांत येतील; शिवाय इतर अनेक सुखसोयी असलेल्या ह्या गाडीला २५,००० डॉलर्स खर्च येईल.

**चिनी बायकोस चालू खर्च कमी**—"सिंगापूर येथील मुलीशीं विवाह करण्याऐवजीं मला चिनी मुलीशीं विवाह करावयाचा आहे, कारण तिला नांदवणें ज्यास्त स्वस्त पडेल" असें सिंगापूर येथील एका कामगारानें तेथील सरकारी अधिकाऱ्यांना सांगितलें.

**साखरेच्या उत्पादनाचा उच्चांक**—म्हैसूर शुगर फॅक्टरीनें साखरेच्या उत्पादनांत १९५१–५२ सालच्या हंगामांत उच्चांक गांठला आहे. कारखाना २८० दिवस चालून त्या काळांत ३७,१५५ टन साखर तयार झाली. येत्या दोन वर्षांत कारखान्याचा विस्तार करून दरसाल ४० ते ५० हजार टन साखर तयार करण्यांत येणार आहे.

# THE BHARAT INDUSTRIAL BANK LIMITED, POONA CITY

Balance Sheet as at 31st December, 1951.

## CAPITAL AND LIABILITIES

| | | Rs. a. p. | Rs. a. p. |
|---|---|---|---|
| 1. | **Capital:–** | | |
| | **Authorised Capital** | | |
| | 1089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares of Rs. 40/- each ... | 43,560—0—0 | |
| | 30,005 Ordinary Shares of Rs. 50/- each ... | 15,00,250—0—0 | 15,43,810—0—0 |
| | **Issued and Subscribed Capital** | | |
| | 1089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares of Rs. 40/- each ... | 43,560—0—0 | |
| | 15005 Ordinary Shares of Rs. 50/- each ... | 7,50,250—0—0 | 7,93,810—0—0 |
| | **Called and Paid up Capital** | | |
| | 1089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares @ Rs. 25/- each ... | 27,225—0—0 | |
| | 15005 Ordinary Shares @ Rs. 25/- each (out of which 5 shares are fully paid) ... | 3,75,250—0—0 | |
| | | 4,02,475—0—0 | |
| | **Less calls unpaid** ... | 2,470—0—0 | |
| | | 4,00,005—0—0 | |
| | **Add Forfeited Shares** | Nil | 4,00,005—0—0 |
| | **Calls in Advance** | | 290—0—0 |
| 2. | **Reserve Fund And Other Reserves** | | 63,500—0—0 |
| 3. | **Deposits And Other Accounts** | | |
| | Fixed Deposits ... | 19,55,444—0—0 | |
| | Savings Bank Deposits ... | 15,63,794—0—5 | |
| | Current Accounts, Contingency accounts etc., ... | 15,85,677—5—7 | 51,04,915—6—0 |
| 4. | **Borrowings From Other Banking Companies, Agents, Etc.** | | |
| | (1) In India ... | 3,00,000—0—0 | |
| | (2) Outside India ... | Nil | 3,00,000—0—0 |
| | **Particulars** | | |
| | (1) Secured (against Pledge of G. P. Notes) Rs. 3,00,000 | | |
| | (2) Unsecured Nil | | |
| 5. | **Bills Payable:–** | | 19,167—0—6 |
| 6. | **Bills For Collection Being Bills Receivable** (As per Contra) | | |
| | (1) Payable in India ... | 1,63,079-11—6 | |
| | (2) Payable Outside India ... | Nil | 1,63,079-11—6 |
| 7. | **Other Liabilities** | | |
| | Sundry Outstandings | 23,326—1—7 | |
| | Interest Payable | 38,013-15—0 | |
| | Unpaid Dividend | 2,383—7—3 | |
| | Rebate on bills Discounted | 560—8—0 | 64,283-15-10 |
| 8. | **Acceptances, Endorsements And Other Obligations:–** Per contra ... | | Nil |
| 9. | **Profit And Loss Account** | | |
| | Profit as per last Balance sheet ... | 25,866—3—0 | |
| | Less appropriations:– ... | | |
| | Reserve Fund ... 12,300—0—0 | | |
| | Provision for Income Tax ... 1,500—0—0 | | |
| | Dividend on 6% Preference Shares 1,633—8—0 | | |
| | Dividend @ 2½% on Ordinary Shares 9,375—0—0 | | |
| | Investment Depreciation Fund 600—0—0 | 25,408—8—0 | |
| | | 457-11—0 | |
| | Add Profit for the year brought from the Profit and Loss Account (Subject to taxation) | 35,688—4—5 | 36,145-15—5 |
| 10. | **Contingent Liabilities:–** | Nil | |
| | Grand Total Rs... | | 61,51,387—1—3 |

## PROPERTY AND ASSETS

| | | Rs. as. p. | Rs. as. p. |
|---|---|---|---|
| 1. | **Cash:–** | | |
| | In hand and with Reserve Bank and Imperial Bank (Including foreign Currency Notes) ... | | 5,94,028—6—3 |
| 2. | **Balances With Other Banks** (In current accounts) | | |
| | (1) In India ... | 2,69,998—1—0 | |
| | (2) Outside India ... | Nil | 2,69,998—1—0 |
| 3. | **Money At Call And Short Notice** | | Nil |
| 4. | **Investments (at cost)** | | |
| | Govt. Securities of the face value of Rs. 21,71,300/- (Average M. value Rs. 20,47,858-0-0) | | |
| | (1) Securities of the Central and state Governments and other trustee securities, including treasury bills of the Central and State Governments | 21,86,924—4—0 | |

(See Profit and Loss Account on Page 156)

# अर्थ

बुधवार, ता. ७ मे, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रिझर्व्ह फंडांतून कामगारांना बोनस

### इंडस्ट्रिअल कोर्टाच्या निवाड्याचे परिणाम

मध्यप्रदेश इंडस्ट्रिअल कोर्टानें २६ मार्च, १९५२ रोजीं दिलेल्या एका विशेष निवाड्याकडे वाचकांचें लक्ष वेधणें आवश्यक आहे. मध्यप्रदेशांतील ११ गिरण्यांच्या संबंधांतील हा निवाडा आहे. त्या गिरण्यांच्या कामगारांनीं १९४९–५० ह्या वर्षाकरितां बोनसची मागणी केली होती; परंतु तो आपणांस देतां येत नाहीं, असें गिरण्यांनीं कळविलें होतें; अपेलेट ट्रिब्यूनलनें घालून दिलेल्या नियमाप्रमाणें त्या गिरण्यांना नफा झालेला नव्हता. ११ गिरण्यांपैकीं ५ गिरण्यांनीं रिझर्व्हज्मधून भागीदारांना नफा वाटला होता. "हा रिझर्व्ह निर्माण करण्यासाठीं कामगारांनीं कष्ट केलेले असल्यानें, त्यांना त्यांतून बोनस मिळणें सामाजिक न्यायास अनुसरूनच होईल" असा इंडस्ट्रिअल कोर्टाचा युक्तिवाद आहे. सामाजिक न्यायाचा प्रश्न बाजूस ठेवतां येईल, कारण त्यासंबंधांत मतभेद होऊं शकतील. इंडस्ट्रिअल कोर्ट तेवढ्यावरच थांबलें असतें, तर कदाचित् भागलें असतें. परंतु, आपल्या निवाड्याच्या समर्थनार्थ त्यानें हिशेबाच्या तत्त्वाबद्दलहि जीं विधानें केलीं आहेत, तीं मान्य करणें कठीण आहे. "दरवर्षी अमुक एक रक्कम रिझर्व्हमध्यें टाकलीच पाहिजे, असा कांहीं नियम नाहीं. ज्यावर्षी बोनस व डिव्हिडंड ह्यांस पुरेल इतका ठोक नफा होणार नाहीं, त्या वर्षी रिझर्व्हमध्यें टाकण्याची रक्कम जरूरीप्रमाणें कमी करतां येणें शक्य आहे." अशी इंडस्ट्रिअल कोर्टाची सूचना आहे!

कंपन्या रिझर्व्ह कशासाठीं निर्माण करतात, हें पाहिलें तर इंडस्ट्रिअल कोर्टाचा निवाडा चमत्कारिक वाटेल. धंद्याला खेळतें भांडवल ज्यास्त प्रमाणांत उपलब्ध व्हावें, ह्यासाठीं नफ्यांतून बाजूस काढून ठेवलेल्या रकमेस रिझर्व्ह असें म्हणतात म्हणजे, कंपनीला नफा झाला, तरी तो भागीदार वाटून न घेतां, धंद्याच्या सोईसाठीं व अडीअडचणींसाठीं उपयोगी पडावा म्हणून धंद्यांतच राहू देतात. ह्या रिझर्व्हचा उपयोग धंद्यासाठींच व्हावा, असा त्याचा हेतु असतो. डिव्हिडंड ईक्वलायझेशन रिझर्व्हचा हेतु, धंद्याच्या चढउताराचा दुष्परिणाम भागीदारांवर होऊं नये, असा असतो. म्हणजे, चलतीच्या वेळीं भरमसाट डिव्हिडंड न घेतां, नफ्याचा कांहीं भाग डि. इ. रिझर्व्हमध्यें टाकण्यांत येतो व अडचणीच्या वर्षी त्या रिझर्व्हमधून जरूर तेवढ्या रकमा काढून घेऊन त्यांतून कांहीं डिव्हिडंड देतां येतें. कंपन्यांच्या भागांमध्यें लोकांनीं आपली शिल्लक गुंतवावी असा उद्देश असला, तर त्यांच्या बचतीस कांहीं तरी मोबदला अखंड मिळत रहाणें इष्ट असतें. मध्यम वर्गीयांचे बाबतींत हें तर विशेषच खरें आहे. त्याखेरीज त्यांना कंपन्यांत रक्कम गुंतविण्यास कांहींच आकर्षण वाटणार नाहीं; कंपन्यांच्या चालकांनीं नफा झाला कीं तो उधळून टाकावा व कठीण दिवस आले कीं खाका वर कराव्या, असा प्रकार होईल. रिझर्व्हज् निर्माण करण्यास प्रोत्साहन उरणारच नाहीं. बोनससाठीं रिझर्व्हचा उपयोग करणें योग्य ठरले, तर इतर दुसऱ्या कोणत्याहि कारणासाठीं त्याचा विनियोग करणें तितकेंच सयुक्तिक ठरेल. म्हणजे, गंगाजळीस कांहीं अर्थच उरणार नाहीं. इंडस्ट्रिअल कोर्टाच्या तावडींत रिझर्व्ह सांपडूं नयेत, म्हणून कंपन्या त्यांतून बोनस शेअर्स भागीदारांना वाटून टाकूं लागतील. इंडस्ट्रिअल कोर्टाचा प्रस्तुत निवाडा औद्योगिक अर्थकारणाशी विसंगत दिसतो.

---

## मागविलेल्या मालाच्या किंमतीवर दिलेलें व्याज

### इनकमटॅक्स कायदाविषयक निवाडा

मेसर्स ई. डी. ससून आणि कं. लि नें मँचेस्टरच्या अर्नाल्ड अँड कं. लि. कडून १९४२ ते १९४५ च्या दरम्यान कित्येक लक्ष रुपयांचे स्टोर्स विकत घेतले. परंतु युद्धकालीन वहातुक-अडचणीमुळें ते आगबोटीनें इकडे आणतां आले नाहींत. मँचेस्टरच्या फर्मनें किंमतीच्या रकमेवर व्याज मागितलें व ससून कंपनीनें तें दिलें. हें व्याज इनकमटॅक्स कायद्याच्या १० (२) (iii) कलमाप्रमाणें उत्पन्नांतून वजा करण्यांत येतें, असें ससून कंपनीचें म्हणणें होतें. मुंबई हायकोर्टात ह्याबाबत वाद गेला, तेव्हां सरन्यायाधीश व न्या. तेंडोलकर ह्यांनीं ससून कंपनीचें म्हणणें मान्य केलें. मँचेस्टरची फर्म आणि ससून कंपनी ('असेसी') ह्यांचेमध्यें व्यवहाराचा संबंध होता आणि म्हणून, दिलेलें व्याज हें भारतांत निष्पन्न झालेलें उत्पन्न समजलें पाहिजे, घेतलेला माल हें 'असेसी'नें घेतलेलें कर्जच मानलें पाहिजे, असा इनकमटॅक्स खात्यामार्फत सॉलिसिटर जनरल ऑफ इंडियानें हायकोर्टात युक्तिवाद केला. परंतु, हायकोर्टानें तो ग्राह्य ठरविला नाहीं. मँचेस्टरच्या फर्मनें भारतांत धंदा केला नाहीं, "असेसी" कंपनीनेंच इंग्लंडमध्यें व्यवहार केला, भारतांत कोणत्याहि प्रकारचें कर्ज आयात झालें नाहीं, माल आयात झाला व त्याचे पैसे लंडनमध्येंच चुकते करण्यांत आले, असें समर्थन न्यायमूर्तींनीं केलें आहे.

---

### जेट एअरलाइनरचा दिवसांत ६,६६३ मैल प्रवास

लंडन–जोहान्सबर्ग (द. आफ्रिका) हा ६,६६३ मैलांचा प्रवास कॉमेट ऑल जेट एअर लाइनरनें ३ मे रोजीं २४ तासांचे आंत संपविला. ३५,००० ते ४०,००० फूट उंचीवरून कॉमेटनें ताशीं ४९० मैलांच्या वेगानें प्रवास केला कॉमेटमध्यें ३६ उतारू होते. त्यापैकीं २ स्त्रिया होत्या २० वर्षंपूर्वी एवढ्या प्रवासास १०½ दिवस लागत; १२ वर्षांपूर्वी ५ दिवस लागत. प्रॉपेलरनें चालणाऱ्या नेहमींच्या विमानांना ह्यापक्षां १,००० कमी मैलांच्या प्रवासास ३२ तास, २५ मिनिटें लागतात जेट एअर लाइनरची ये–जा जुलैपासून पाकिस्तान, भारत व सिंगापूर येथपर्यंत चालू होईल.

---

### कोल्हापूर येथील ट्रेझरीचें काम

कोल्हापूर येथील ट्रेझरीचें काम तेथें नव्यानें सुरू करण्यांत आलेल्या इंपीरिअल बँकेच्या शाखेकडे 'देण्यांत' आलें आहे. त्यामुळें सरकारच्या खर्चांत कांहीं बचत होणार आहे.

## अन्न किती वाट्यास येतें ?

### भारतीयांचा अनुक्रम सर्वांत खाली

जगांतील लोक किती अन्न खातात ? ऑस्ट्रिया, बर्मा, फ्रान्स, ग्रीस, इटली व प. जर्मनी ह्यांत दर दिवशीं युद्धापूर्वीपेक्षां कमी कॅलरी अन्न मिळतें. उलट, ब्राझील, कोलंबिया, सायप्रस, इंडो-चायना, द. आफ्रिका व टर्की येथील लोकांना ज्यास्त कॅलरी मिळतात. खालील तक्त्यांत दर दिवशीं किती कॅलरी मिळतात, तें देशवार दाखविलें आहे. भारत सर्वांत कनिष्ठ स्थानीं आहे.

३००० कॅलरी किंवा अधिकः—

कॅनडा, यु. स्टेट्स, डेन्मार्क, फिनलंड, आइसलंड, आयर्लंड, नॉर्वे, स्वीडन, स्विटझरलंड, ग्रेट ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड.

२,८००–२,९९९ कॅलरीः—

बेल्जम्–लक्झेंबर्ग, नेदरलंडस.

२,६००–२,७९९ कॅलरीः—

क्यूबा, अर्जेंटिना, ऑस्ट्रिया, फ्रान्स, प. जर्मनी, चेखोस्लोव्हाकिया, पोलंड, टर्की.

२,४००–२,५९९ कॅलरीः—

इजिप्त, द. आफ्रिका, युराग्वे, सायप्रस, ग्रीस.

२,२००–२३९९ कॅलरीः—

ब्राझील, चिली, कोलंबिया, इटली

२,०००–२,१९९ कॅलरीः—

जपान, पाकिस्तान, इंडोचायना

२,००० कॅलरीखालीं:—

भारत, बर्मा, सिलोन.

---

## लोकसंख्या आणि अन्नधान्याचें उत्पादन

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या अन्न व शेतकी संघटनेचे डायरेक्टर जनरल मि. मॉरीस डॉड ह्यांनीं अन्नधान्य व लोकसंख्या ह्यासंबंधी कांहीं उद्बोधक माहिती नुकतीच सांगितली. ते म्हणाले कीं, १९३६ सालापासून जगांतील लोकसंख्या सुमारें १३ टक्क्यांनीं वाढली, पण अन्नधान्याचें उत्पादन मात्र फक्त ९ टक्क्यांनींच वाढलें. आशियांत तर ह्या महत्त्वाच्या बाबतींत परागतीच झालेली दिसून येते. दुसऱ्या महायुद्धापूर्वी आशिआ खंडांत जितकें अन्नधान्याचें उत्पादन होत होतें त्याच्यापेक्षां ते ६ टक्क्यांनीं कमीच होत आहे. गेल्या १५ वर्षांत जपानची लोकसंख्या ७·२ कोटींपासून ८·७ कोटींपर्यंत वाढली आहे. जपानमधील लोकांचा तांदूळ हा मुख्य आहार आहे. तांदुळाच्या पुरवठ्याची परिस्थिति मात्र अतिपूर्वेकडील राजकीय वातावरणावर अवलंबून असल्यामुळें ती जेपानच्या आटोक्याबाहेरची आहे. आग्नेय आशियांतील इतर देशांकडून जपानला तांदुळाचा पुरवठा होऊं शकला असता. परंतु आपल्या पौंडी गंगाजळीचा उपयोग करण्याच्या मार्गांत जपानला अडथळा आल्यामुळें तें शक्य झालें नाहीं. आशिआंतील धान्योत्पादनाच्या वाढींत दोन मुख्य अडचणी आहेतः— (१) बहुतेक अविकसित राष्ट्रें मागासलेल्या शेतकीचीं आहेत, आणि ( २ ) शेतकऱ्यांना पतीवर कर्जें देण्याची पुरेशी सोय ह्या देशांत नाहीं. मि. डॉड ह्यांनीं केलेलें विवेचन महत्त्वाचें असलें तरी एका दृष्टीनें अपुरें वाटतें. शेतीच्या मालाच्या किंमती योग्य पातळीवर स्थिर राखण्याचे प्रयत्न झाल्याखेरीज शेतीच्या उत्पादनांत झालेली वाढ कायम स्वरूपाची होणार नाहीं. अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रांना सुद्धां ह्यासाठीं खास कायदे करावे लागतात, हें विसरून चालणार नाहीं.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. ( स्थापना १९१८ )
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
ठेवी १ कोटीवर
हेड ऑफिस- गिरगांव, मुंबई.

## जागतिक बँकेला झालेला भरपूर नफा

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यांत जागतिक बँकेला जो नफा झाला आहे त्याचे आंकडे बँकेतर्फे प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. गेल्या आर्थिक वर्षाच्या ह्याच काळांत बँकेला १,१५,००,००० डॉलर्स नफा झाला होता. चालू वर्षी तो १,२५,००,००० डॉलर्स झाला आहे. बँकेनें दिलेल्या कर्जाऊ रकमेवर हा नफा झाला असून तो बँकेच्या जनरल रिझर्व्ह फंडांत जमा करण्यांत आला आहे. भावी काळांत एखाद्या ऋणकोनें कर्जफेड केली नाहीं, तर दक्षता म्हणून ही व्यवस्था करण्यांत आली आहे. आतांपर्यंत असा प्रसंग आलेला नसून जनरल फंडाची रक्कम ५,४५,००,००० डॉलर्स झाली आहे. बँकेचें आर्थिक वर्ष पहिल्या जुलैला सुरू होतें. १९५२ मध्यें बँकेनें आर्थिक वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांत सभासद-राष्ट्रांपैकीं १४ राष्ट्रांना कर्जें दिलीं. सध्यां बँकेचे ५१ सभासद आहेत. कर्जाऊ दिलेली एकूण रक्कम २१,२७,००,००० डॉलर्स आहे. बँकेच्या स्थापनेपासून तिनें सभासदांना १,३२,६०,००,००० डॉलर्स रक्कम कर्जाऊ दिली आहे. वरील काळांत बँकेला ३,१२,००,००० डॉलर्स उत्पन्न झालें. त्यापैकीं ५५,००,००० डॉलर्स बँकेनें जीं कर्जें दिलीं त्यावर घेतलेल्या एक टक्का कमिशनच्या रूपानें झालेलें आहे. कमिशनच्या रूपानें आलेली रक्कम स्पेशल रिझर्व्ह फंडांत ठेवण्यांत येते. ही रक्कम आतां २,५६,००,००० डॉलर्स झाली आहे. बँकेनें आपली उत्पन्नाची बाजू अधिक बळकट करण्यासाठीं कॅनडांत १,५०,००,००० डॉलर्स किंमतीचे बाँडस विक्रीला काढले. त्यापैकीं सुमारें ७१,००,००० डॉलर्सचे बाँडस् कर्ज घेणाऱ्या देशांनीं विकत घेतले आणि बँकेजवळ तारण म्हणून ठेवले. सोयीसाठीं बँक आपले सर्व व्यवहार डॉलर्सच्या चलनांत मांडून दाखविते. पण ह्याचा अर्थ बँक फक्त डॉलर्सचेच व्यवहार करते, असा मात्र नाहीं. डॉलर्सशिवाय दुसरें कोणतेंही चलन सभासद-राष्ट्राला पाहिजे असलें तरीसुद्धां बँक तें पुरवितें. बहुतेक सर्व कर्जें अमेरिकन डॉलर्समध्यें दिलीं जातात. हा सर्व पैसा अमेरिकन सरकारनेंच पुरविलेला असतो असें नाहीं. अमेरिकेंत खाजगी भांडवलाच्या बाजारांत सुद्धा बँक पैसे उभे करते. अशा रीतीनें बँकेनें बाँडस् काढून ४०,००,००,००० डॉलर्स रक्कम उभारली आहे.

---

## आपण आहोंत किती ?

१९५० च्या मध्याच्या सुमाराच्या अंदाजाप्रमाणें, जगाची लोकसंख्या २४० कोटी आहे. त्यापैकीं निम्म्यापेक्षां अधिक लोक आशियांत ( रशिया वगळून ) रहातात. युरोपांत ( रशिया वगळून ) सर्वांत दाट ( चौरस किलोमीटरला ८० ) वस्ती आहे. आशियांत ( रशिया वगळून ) ती चौरस किलोमीटरला ४७ पडते. ऑस्ट्रेलियांत दर चौरस किलोमीटरला फक्त २ लोकवस्ती आहे. उत्तर अमेरिकेंत ९, यु. स्टेट्समध्यें १९, मेक्सिकोंत १३, कॅनडांत १, असे इतर ठिकाणचे आकडे आहेत. सबंद जगाचा एकत्रित विचार केला, तर दर चौरस किलोमीटरला १८ लोकसंख्या असें प्रमाण आढळतें. आशियांतील देशांत जपान सर्वांत दाट वस्तीचा ( चौरस किलोमीटरला २२५ ) देश आहे. भारतांत तें प्रमाणें ११३ व पाकिस्तानांत ७९ आहे.

# THE BHARAT INDUSTRIAL BANK LIMITED, POONA CITY

Balance Sheet as at 31st December, 1951.

## PROPERTY AND ASSETS [ *continued* ]

| | | Rs. as. p. | Rs. as. p. |
|---|---|---|---|
| (2) Shares-Ordinary shares of a Co-op. Bank fully Paid ( at cost ) | | 60—0—0 | |
| (3) Debentures or Bonds ... | | Nil | |
| (4) Other investments ... | | Nil | |
| (5) Gold ... | | Nil | 21,86,984—4—0 |
| **5.** **Advances:-** (Other than bad and doubtful debts for which provision has been made to the satisfaction of the auditors ) ... | | | |
| **(1) Loans, Cash Credits, Overdrafts etc.** | | | |
| (i) In India | 24,46,501-7-6 | | |
| (ii) Outside India | Nil | 24,46,501—7—6 | |
| **(2) Bills Discounted and Purchased** (excluding treasury bills of the Central and State Governments ) | | | |
| (i) Payable in India | 2,94,030-12-0 | | |
| (ii) Payable outside India | Nil | 2,94,030-12—0 | 27,40,532—3—6 |
| **Particulars Of Advances:-** | | | |
| (1) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured ... | | 19,81,287-15—6 | |
| (2) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the Debtors' personal security. ... | | 1,23,096—4—0 | |
| (3) Debts considered good secured by the Personal liability of one or more parties, in addition to the personal security of the Debtors. ... | | 6,36,148—0—0 | |
| (4) Debts considered doubtful or bad, not provided for ... | | Nil | |
| | | 27,40,532—3—6 | |
| (5) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally, or jointly with any other person ... | | 1,81,454-13—9 | |
| (6) Debts due by Companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, partners or managing Agents or, in the case of the private companies, as members ... | | 5,08,024-12—3 | |
| (7) Maximum total amount of advances, including temporary advances made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | | 1,96,855—9—0 | |
| (8) Maximum total amount of advances including temporary advances, granted during the year to the Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of the private companies as members ... | | 5,16,167—1—3 | |
| (9) Due from Banking Companies ... | | Nil | |
| **6.** **Bills Receivable Being Bills For Collection** as per contra | | | |
| (1) Payable in India .. | | 1,63,079-11—6 | |
| (2) „ outside India ... | | Nil | 1,63,079-11—6 |
| **7.** **Constituents' Liabilities For Acceptances, Endorsements And Other Obligations** per contra | | | Nil |
| **8.** **Premises** ( at cost ) | | 78,853-10—0 | |
| Less Depreciation | | Nil | 78,853-10—0 |
| **9.** **Furniture And Fixtures** ( at cost ) | | 26,459-15—7 | |
| Additions during the year | | 964—8—6 | |
| | | 27,424—8—1 | |
| Less depreciation upto 31-12-50 | 3,779-15-7 | | |
| during the year | 644--8-6 | 4,424—8—1 | 23,000—0—0 |
| **10.** **Other Assets, Including Silver** | | | |
| Sundry Assets ... | | 5,366-10—0 | |
| Interest accrued on Govt. Securities ... | | 18,768-11-0 | |
| Advance payment of Income Tax ... | | 7,201—8—0 | |
| Income Tax deducted at source ... | | 16,902—6—0 | |
| Stock of Printing ( at cost ) ... | | 25,760—8—0 | |
| Library ( at cost ) Stamps and Advance to Staff ... | | 1,977-10—6 | |
| Due from Bank in liquidation ( not provided for ) ... | | 17,460—9—0 | |
| Branch Adjustments ... | | 1,472-14—6 | 94,910-13—0 |
| **11.** **Non-Banking Assets Acquired In Satisfaction Of Claims** | | | Nil |
| Grand Total Rs. ... | | | 61,51,387—1—3 |

( See Profit and Loss Account on Page 156 )

# THE BHARAT INDUSTRIAL BANK LIMITED, POONA CITY

Profit and Loss Account for the year ended 31st December, 1951.

## EXPENDITURE

| | | Rs. as. p. | Rs. as. p. |
|---|---|---|---|
| 1. | Interest paid on deposits, borrowings etc., ... | | 1,12,938—9—8 |
| 2. | Salaries and Allowances and Provident Fund ... | | |
| | Salary ... | 76,561-12—0 | |
| | Bonus ... | 4,013—8—0 | |
| | Provident Fund ... | 3,169—4—0 | |
| | (including amount paid to Managing Directors Rs. 13,920-8-0) | | 83,744—8—0 |
| 3. | Directors' and Local Committee members' fees and allowances ... | | 2,560—0—0 |
| 4. | Rent, Taxes, Insurance, Lighting etc., ... | | 7,740-12—6 |
| 5. | Law charges ... | | 1,286—9—0 |
| 6. | Postages, Telegrams and Stamps. ... | | 5,284-10—3 |
| 7. | Auditors' Fees ... | | 600—0—0 |
| 8. | Depreciation on and repairs to the banking company's property ... | | 561-14—3 |
| 9. | Stationery, Printing, Advertisement, etc., ... | | 6,977—2—6 |
| 10. | Loss from sale of or dealing with non-banking assets ... | | Nil |
| 11. | Other Expenditure: ... | | |
| | Miscellaneous Expenses ... | 55—0—0 | |
| | Travelling Expenses ... | 4,064-10—0 | |
| | Other Expenses ... | 3,098—4—6 | |
| | Income-Tax ... | 12,254-12—0 | 19,472-10—6 |
| 12. | Balance of Profit, (Subject to taxation) ... | | 35,688—4—5 |
| | Total... | | 2,76,855—1—1 |

## INCOME (Less provision made during the year for bad & doubtful debts & other usual or necessary provisions)

| | | Rs. as. p. | Rs. as. p. |
|---|---|---|---|
| 1. | Interest and Discount ... | | |
| | Interest ... | 2,39,427—7—2 | |
| | Discount ... | 20,332—5—6 | 2,59,759-12—8 |
| 2. | Commission, Exchange and Brokerage ... | | 12,387-13—9 |
| 3. | Rents ... | | 1,278—0—0 |
| 4. | Net profit on sale of investment, gold, and silver, land, premises and other assets. (not credited to Reserves or any particular Fund or Account) ... | | Nil |
| 5. | Net profit on revaluation of investments, gold and silver, land, premises and other assets (not credited to Reserves or any particular Fund or Account) ... | | Nil |
| 6. | Income from non-banking assets, and profit from sale of or dealing with such assets. ... | | Nil |
| 7. | Other receipts ... | | |
| | Miscellaneous receipts | 3,386—6—8 | |
| | Share Transfer fees | 43—0—0 | 3,429—6—8 |
| | Total ... | | 2,76,855—1—1 |

M. K. Ternikar, Acountant. N. N. Kshirsagar. R. B. Salvekar, Managing Directors.
B. B. Walvekar, Chairman. K. P. Joshi, Vice-Chairman. Mrs. Indumatibai R. Phadke,
B. P. Kelkar, R B. Girme, K. M. Mahajan, R. P. Damodare, H. B. Girme, Directors.

### Report of the Auditors to the Share-holders

We have examined the above Balance Sheet of the Bharat Industrial Bank Limited, as on 31st December, 1951, and the annexed Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date in which are incorporated the authenticated returns from Branches and report that:—

(1) We have obtained all the information and explanations, we have required. (2) In our opinion, the above Balance Sheet and Profit and Loss Account are drawn up in conformity with the law. (3) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the state of the Bank's affairs according to the best of our information and explahtions given to us and as shown by the books of the Bank. (4) In our opinion the Books of Acconnt have been kept by the Bank as required by Sec. 130 of the Indian Companies Act 1913. (5) The information and Explanations required by us have been found to be satisfactory. (6) The transactions of the Bank which have come to our notice have been within the powers of the Bank. (7) The returns received from Branch offices of the Bank have been found adequate for the purpose of the Audit. (8) The Profit and Loss Account shows a true balance of Profit and Loss for the period covered by such account.

Poona, Dated 9th Feb. 1952. Khare & Co., Chartered Accountants.

(See Balance Sheet on Pages 154 and 155)

हें पत्र पुणें, ऐठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.